// सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.
दुरध्वनी क्रं.-२५६५१४३
फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३
E-mail: ronagpur.dte@gmail.com
Web Site :- www.rdtenagpur.org.in

**अतिमहत्त्वाचे**

क्रमांक :- तंशिस/विकाना/ईबीसी/२०१५/ 1190
दिनांक:- 22 APR 2015

प्रति,
संचालक/प्राचार्य,
खाजगी व कायम विनाअनुदानित संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

**विषय:- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत.**

संदर्भ:- संचालनालयाचे पत्र क्रं. १५/अर्थस/ईबीसी-परिपत्रक/२०१४-१५/०६, दि. १८ एप्रिल २०१५

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांची आधार कार्ड नोंदणी करणे तसेच आधार कार्ड क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न / लिंक करणेबाबत विद्यार्थ्यांना सुचित करण्याबाबत आपणास कळविण्यांत आले होते. तसेच संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे सुलभ व्हावे याकरीता संस्थास्तरावर कँप आयोजित करणेबाबत संबंधित एजन्सिशी समन्वय साधणेसाठी सुध्दा सुचविण्यांत आले होते.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक तसेच आधार कार्ड क्रमांक संलग्न केलेले त्यांची कोअर बँकींगची सुविधा असलेले बँक खाते क्रमांक याची माहिती संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरील EBC Scholarship प्रणालीमध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरून सुचना देण्याबाबत कळविण्यांत आले होते. तथापि अद्यापावेतो विद्यार्थ्यांनी त्यांचे आधार कार्ड क्रमांक तसेच बँक खात्याच्या तपशिलाची माहिती संगणक प्रणालीवर भरलेले नाही असे दिसून येते. ज्या विद्यार्थ्यांचे बँक खाते व आधार कार्ड क्रमांक अद्यापपर्यंत उलब्ध झालेले नाही अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता संस्थेंने संबंधित एजन्सिला संपर्क साधून संस्थेमध्ये कॅम्प आयोजित करावा किंवा विद्यार्थ्यांनी संबंधित एजन्सिकडून आधार कार्ड उपलब्ध करून घ्यावे याबाबत संस्थेंने आपल्या स्तरावरून सुचना देण्यात याव्या.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी संलग्न करून अद्यावत केलेली माहिती **दिनांक १५ मे २०१५ पर्यंत** संगणक प्रणालीवर नोंदविण्यांत यावी. तसेच विद्यार्थ्यांच्या बँक तपशिलाची माहिती संस्थाप्रमुखांनी प्रमाणित करून या कार्यालयाकडे **दिनांक २० मे २०१५ पर्यंत** जमा करण्यांत यावी. जेणे करून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करणे सुलभ होईल. ज्या विद्यार्थ्यांची माहिती संगणक प्रणालीवर नोंदविण्यांत येणार नाही अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम मिळणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील.

**सहपत्र:- संदर्भिय पत्र.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीकरीता मानार्थ सादर.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


अत्यंत महत्वाचे

क्रमांक:१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक/२०१४-१५/०६
दिनांक : 18 APR 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत...

संदर्भ :-१.या संचालनालयाचे पत्र क्र.१०/एनजीपी/आधारकार्ड/२०१४/५,दि. ८ जाने. २०१५.
२. या संचालनालयाचे पत्र क्र.१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४१५/२२३, दि.१३ मार्च २०१५.
३.या संचालनलाचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक/२०१४-१५/२३३,दि.२३मार्च २०१५.
४.या संचालनालयाचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक ।२०१४-१५/२३५,दि.२४मार्च२०१५.
५.या संचालनालयाचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक ।२०१४-१५/२४६,दि.४एप्रिल२०१५.

खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या अर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी संलग्न/लिंक करणेबाबत विद्यार्थ्यांना सुचित करण्याबाबत संबंधित संस्थाना आपल्या स्तरावरुन कळविण्याच्या सुचना संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये आपणास दिलेल्या आहेत.तसेच संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे सुलभ व्हावे याकरीता संस्थास्तरावर कँप आयोजीत करणेबाबत संबंधित Agency शी समन्वय साधणेसाठी संस्थाना सुचना देण्याबाबत संदर्भ क्र.४ व ५ च्या पत्रान्वये निर्देशित केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील अर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक तसेच आधार कार्ड क्रमांक संलग्न केलेले त्यांची कोअर बँकीगची सुविधा असलेले बँक खाते क्रमांक याची माहिती संचालनालयाच्या dtemaharashtra.org.in या संकेतस्थळावरील EBC Scholarship प्रणालीमध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना संस्थांनी सुचित करणेबाबत आपल्यास्तरावरुन सुचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि अद्यापावेतो विद्यार्थ्यांनी त्यांचे आधारकार्ड क्रमांक तसेच बँक खात्याच्या तपशिलाची माहिती संगणक प्रणालीवर भरलेले नाही असे दिसून येते. ज्या विद्यार्थ्यांचे बँक खाते व आधारकार्ड क्रमांक अद्यापपर्यंत उपलब्ध झालेले नाही अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता संस्थांनी संबंधित एजन्सिला संपर्क साधून संस्थेमध्ये कँप आयोजित करावा. किंवा विद्यार्थ्यांनी संबंधित एजन्सिकडून आधारकार्ड उपलब्ध करुन घ्यावे.याबाबत संस्थांनी विद्यार्थ्यांना सूचना देण्याबाबत कळविण्यात यावे.

आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी संलग्न केलेली अद्ययावत माहिती **दिनांक १५ मे २०१५ पर्यंत** प्रणालीवर नोंदविणेबाबत कळवावे. विद्यार्थ्यांच्या बँक तपशिलाची माहिती संस्थाप्रमुखांनी प्रमाणित करुन आपल्या कार्यालयाकडे **दिनांक २० मे २०१५ पर्यंत** जमा करण्याबाबत सूचना द्याव्यात. उपरोक्त सर्व माहिती आपल्या स्तरावर **दिनांक ३१ मे २०१५ पर्यंत** अद्ययावत ठेवावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करणे सुलभ होईल.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक ,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- १. प्रणाली विश्लेषक तथा समन्वयक तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई. यांच्या माहिती व पुढील कार्यवाही करीता.

२. व्यवस्थापक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांच्या माहिती व पुढील कार्यवाही करीता.

३. संबंधित सर्व संस्था.